# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक 1967, मुंबई - 400001

दूरध्वनी - 22620601, 22690602 22641150/51, फॅक्स 26292102

E-mail :- desk12@gmail.com internet :- http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : 12/आस्था(2)/2016/मलोआ/29591

दिनांक : 8 DEC 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

विषय : आयोगातर्फे सन 2017 मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या अंदाजित वेळापत्रकाबाबत..

संदर्भ : मा. अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. सीटीटी 0917/ सीआर 62/ 2016/ तीन, दि. 22.11.2016

उपरोक्त विषयाचे संदर्भाधीन पत्र पहावे, त्वरित संदर्भासाठी पत्राची छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक निश्चीत करण्यात आलेले असून त्यांच्या अधिपत्याखालील संस्थांमार्फत आयोजित परीक्षा व आयोगामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षा एकाच दिवशी येणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी. त्याअनुषंगाने करण्यात आलेली आवश्यक ती माहिती आयोगास विनाविलंब सादर करावी.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :
1. मा.अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
2. कार्यासन क्रमांक 2अ, मुख्य कार्यालय, मुंबई

शिक्षण
आस्था

---

पृष्ठांकन क्र:-विकाअ/शिक्षण/MPSC/२०१६/3744
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 6 DEC 2016

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

**प्रत :-**

१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित/विना-अनुदानित संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, वरील पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१९८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्र.सीटीटी-०१२७/सीआर-६२/२०१६/तीन दिनांक :- २२ नोव्हेंबर, २०१६.
तात्काळ/कालमर्यादा

प्रति,
संचालक तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य
तंत्रशिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई - ४००००१.

**विषय - आयोगातर्फे सन-२०१७ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षांच्या अंदाजित वेळापत्रकाबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास असे कळविण्यात येते की, सन-२०१७ मध्ये आयोगामार्फत घेण्यात येणा-या परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाकडून निश्चित करण्यात आले असून सदर वेळापत्रकाची प्रत आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविली आहे. सदर वेळापत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात आले आहे.

२. एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या संस्थांच्या परीक्षा असल्यास उमेदवारांना एका परीक्षेच्या संधीपासून वंचित रहावे लागते. परिणामी परीक्षेचा दिनांक ऐनवेळी बदलण्याची मागणी होते. अन्यथा उमेदवाराचे कायमस्वरुपी नुकसान होऊ शकते. तसेच, इतरही प्रशासकीय अडचणी उदभवतात. सदर परिस्थिती टाळण्याच्या दृष्टीने आपल्या संस्थेमार्फत सन-२०१७ मध्ये घेण्यात येणा-या संभाव्य परीक्षांचा कार्यक्रम/वेळापत्रक निश्चित करुन सदर आयोजित कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

३. आपल्या संस्थेचा सन २०१७ मधील परीक्षांचा अंदाजित कार्यक्रम निश्चित करताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विविध परीक्षांसाठी सोबतच्या अंदाजित वेळापत्रकाद्वारे निश्चित केलेले दिनांक विचारात घेण्यात यावेत व आपल्या संस्थेमार्फत आयोजित परीक्षा व आयोगामार्फत आयोजित करण्यात येणा-या परीक्षा एकाच दिवशी येणार नाहीत, याची काटेकोरपणे दक्षता घेण्यात यावी, अशी विनंती आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत कृपया आयोगास तात्काळ अवगत करुन आयोगास सहकार्य करण्यात यावे, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

(सु.ह.अवताडे)
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

पत्र प्राप्त झाले
25 NOV 2016
संचालक तंत्रशिक्षण
३, महापालिका मार्ग

२९५९१
२९/११/२०१६

# स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक - सन २०१७

| अ. क्र. | परीक्षेचे नांव | जाहिरात | पूर्व परीक्षा दिनांक | पूर्व परीक्षेचा कालावधी | मुख्य परीक्षा दिनांक | मुख्य परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तांत्रिक सहायक परीक्षा २०१६ | ऑक्टोबर, २०१६ | --- | --- | १५.१.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| २ | विक्रीकर निरीक्षक परीक्षा २०१६ | नोव्हेंबर, २०१६ | २९.१.२०१७ (रविवार) | १ दिवस | २८.५.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| ३ | राज्य सेवा परीक्षा २०१७ | डिसेंबर, २०१६ | २.४.२०१७ (रविवार) | १ दिवस | १६,१७ व १८.९.२०१७ (शनिवार,रविवार व सोमवार ) | ३ दिवस |
| ४ | पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१७ | जानेवारी, २०१७ | १२.३.२०१७ (रविवार) | १ दिवस | ११.६.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| ५ | सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा २०१७ | जानेवारी, २०१७ | ३०.४.२०१७ (रविवार) | १ दिवस | ६.८.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| ६ | लिपिक-टंकलेखक परीक्षा २०१७ | फेब्रुवारी, २०१७ | १४.५.२०१७ (रविवार) | १ दिवस | ३.९.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| ७ | दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा २०१७ | फेब्रुवारी, २०१७ | २१.५.२०१७ (रविवार) | १ दिवस | ८.१०.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| ८ | दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-क परीक्षा २०१७ | फेब्रुवारी, २०१७ | २.७.२०१७ (रविवार) | १ दिवस | १५.१०.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| ९ | महाराष्ट्र वन सेवा परीक्षा २०१७ | मार्च, २०१७ | ४.६.२०१७ (रविवार) | १ दिवस | २४.९.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| १० | **महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०१७** | मार्च, २०१७ | ९.७.२०१७ (रविवार) | १ दिवस | --- | --- |
| | **१०.१** महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१७ | --- | --- | --- | २६.११.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| | **१०.२** महाराष्ट्र विदयुत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१७ | | | | २६.११.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| | **१०.३** महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१७ | | | | १७.१२.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| | **१०.४** महाराष्ट्र विदयुत/यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१७ | | | | २४.१२.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| ११ | सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१७ | एप्रिल, २०१७ | --- | --- | २५.६.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| १२ | **सहायक कक्ष अधिकारी, विक्रीकर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक संयुक्त पूर्व परीक्षा २०१७** | एप्रिल, २०१७ | १६.७.२०१७ (रविवार) | १ दिवस | --- | --- |
| | **१२.१** पोलीस उप निरीक्षक मुख्य परीक्षा २०१७ | --- | --- | --- | ५.११.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| | **१२.२** सहायक कक्ष अधिकारी मुख्य परीक्षा २०१७ | | | | १०.१२.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| | **१२.३** विक्रीकर निरीक्षक मुख्य परीक्षा २०१७ | | | | ७.१.२०१८ (रविवार) | १ दिवस |
| १३ | कर सहायक परीक्षा २०१७ | एप्रिल, २०१७ | २०.८.२०१७ (रविवार) | १ दिवस | ३१.१२.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| १४ | महाराष्ट्र कृषि सेवा परीक्षा २०१७ | एप्रिल, २०१७ | ३०.७.२०१७ (रविवार) | १ दिवस | १७.१२.२०१७ (रविवार) | १ दिवस |
| १५ | विक्रीकर निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१७ | सप्टेंबर, २०१७ | --- | --- | ५.११.२०१७ (रविवार) | १ दिवस |

टीप :- (१) शासनाकडून संबंधित पदांसाठी विहित वेळेत मागणीपत्र प्राप्त होईल; या गृहितकाच्या आधारे उपरोक्त अंदाजित वेळापत्रक प्रस्तावित करण्यात आले आहे. शासनाकडून विहित वेळेत मागणीपत्र प्राप्त झाल्यासच नियोजित दिनांकास पदे विज्ञापित करणे व पुढील वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा घेणे शक्य होईल. (२) उपरोक्त अंदाजित वेळापत्रकाबाबतची **सद्यस्थिती दर्शविणारी** अद्ययावत माहिती (Updates) वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

दिनांक :- २१ नोव्हेंबर, २०१६

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग